जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 FEB 2024
पुढारी



कोल्हापूर : इनोव्हेशन, स्टार्टअप स्पर्धा व प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. सागर डेळेकर, डॉ. अपूर्व गुलेरिया, डॉ. प्रभात सिंग आदी.

# विद्यार्थ्यांकडून संशोधन, उद्योग संकल्पना, उत्पादनांचे सादरीकरण

## विद्यापीठात इनोव्हेशन, स्टार्टअप्स स्पर्धेचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राच्या वतीने इनोव्हेशन, उद्योजकता आणि स्टार्टअप्स यांचे भित्तीचित्र प्रदर्शन, मॉडेल सादरीकरण यांची स्पर्धा झाली.

स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. स्पर्धेत शाश्वत विकासाबाबत पर्यावरणीय संकल्पना, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनवणे, फौंड्रीतील टाकाऊ वाळूपासून विटांची निर्मिती व रस्त्याकरिता पुनर्वापर, पौष्टिक खाद्यपदार्थ निर्मिती पद्धती, नॅनो-पदार्थापासून औषधे, रंग निर्मिती, जैविक खते, ऊर्जा निर्मिती, हायड्रोजन आणि ऑक्सिजन निर्मितीची उपकरणे संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी मुंबईच्या भाभा अणू संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. अपूर्व गुलेरिया व डॉ. प्रभात सिंग, डॉ. प्रतिभा पाटणकर, डॉ. आसावरी जाधव, डॉ. संतोष सुतार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. विद्यापीठाच्या इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजन करण्यात आले.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. एस. एन. सपली, डॉ. के. एम. गरडकर, डॉ. अनिल घुले, डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. ईरान्ना उडचान, डॉ. हेमराज यादव, डॉ. अभिजित गाताडे, चेतन भोसले, डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. साजिद मुल्लाणी आदी उपस्थित होते.

28 FEB 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ग्रंथदिंडी, रिंगण सोहळा

कोल्हापूर, ता. २७ : ग्रंथदिंडी, रिंगण सोहळ्याने शिवाजी विद्यापीठात आज मराठी अधिविभागातर्फे 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. प्रभाकर देसाई यांचे 'भाषा आणि संस्कृती' या विषयावर व्याख्यान झाले.

हुपरीच्या संत बाळूमामा पायी दिंडी मंडळाच्या सदस्यांनी दिंडीमध्ये रंगत आणली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पालखी पूजनाने मुख्य प्रशासकीय इमारतीपासून दिंडीला सुरुवात होऊन ती परिसरातून वि.स. खांडेकर भाषा भवनपर्यंत नेण्यात आली. मुख्य इमारतीसमोर रिंगण सोहळा रंगला. डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. सुहासिनी पाटील, रामचंद्र पवार, वैभव ढेरे सहभागी झाले.



कोल्हापूर : विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीवेळी मुख्य प्रशासकीय भवन इमारतीसमोर रिंगण सोहळा रंगला.

दरम्यान, डॉ. देसाई यांच्या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे होते, तर डॉ. गोमटेश्वर पाटील प्रमुख उपस्थित होते. मराठी भाषेच्या माध्यमातून सांस्कृतिक विविधता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे डॉ. देसाई यांनी सांगितले. विभागातील विद्यार्थिनी कांचन देशपांडे यांनी तलाठी परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल, तर राजेश पाटील, विश्वास घोडे यांची शिक्षक पदभरती परीक्षेतून गुणवत्ता यादीत निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

28 FEB 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषेतून सांस्कृतिक वृद्धिंगता गरजेची

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. प्रभाकर देसाई यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मराठी भाषेच्या माध्यमातून सांस्कृतिक विविधता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'भाषा आणि संस्कृती' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे होते, तर डॉ. गोमटेश्वर पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देसाई म्हणाले, भाषेच्या सहाय्यानेच सांस्कृतिक राजकारण ताब्यात घेतले जाते. ज्यांच्या हाती भाषा, त्यांच्याच ताब्यात आशय, नियोजन राहते. हे मोठे भाषिक राजकारण आहे. अशा राजकारणापासून भाषेला दूर राखता येऊ शकते. भाषा ही समाजाच्या बहुसांस्कृतिक विकासाचे मोठे साधन आहे. तिच्या या क्षमतांचा सकारात्मक वापर करून घेणे आवश्यक



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीवेळी मुख्य प्रशासकीय भवन इमारतीसमोर रिंगण सोहळा रंगला.

आहे. महानुभाव पंथापासून ते पुढे संत ज्ञानेश्वरांपासून ते अखंड संत परंपरेद्वारे हे विकसन होऊन सर्जनशीलतेपर्यंतचा भाषिक प्रवास मराठीने केलेला आहे. भाषासौंदर्य, निर्मितीशीलता, बहुप्रसवता, सर्जनशीलता आदी मूल्यांकडे दुर्लक्ष करून ठराविक निकषांवर अभिजाततेची निश्चिती करण्यासाठी आग्रही राहणे गैर आहे. भाषेला प्रतिकात्मकतेमध्ये बंदिस्त करणे, तिच्याकडे शस्त्र किंवा उत्पादन म्हणून पाहणे हा खरा असंस्कृतपणा आहे. भाषा ही लोकसमूहाची निर्मिती आहे. अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. मोरे म्हणाले, भाषेचे सांस्कृतिक योगदान सातत्याने अधोरेखित करीत राहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अभ्यास करीत असताना उपयोजनाच्या अंगाने भाषिक कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे.

कांचन देशपांडे यांनी तलाठी परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल तर राजेश पाटील व विश्वास घोडे यांची शिक्षक पदभरती परीक्षेतून गुणवत्ता यादीत निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सुस्मिता खुटाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर सुखदेव एकल यांनी आभार मानले.

### विद्यापीठ परिसरातून ग्रंथदिंडी

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मराठी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातून ग्रंथदिंडी काढली. हुपरीच्या संत बाळुमामा पायी दिंडी मंडळाच्या सदस्यांनी दिंडीमध्ये मोठी रंगत आणली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पालखीपूजनाने दिंडीला सुरवात होऊन ती परिसरातून वि.स. खांडेकर भाषा भवनपर्यंत नेण्यात आली. पालखीमध्ये भारतीय संविधान, ज्ञानेश्वरी, तुकोबारायांची गाथा यांच्यासह मराठी ग्रंथ ठेवण्यात आले होते. मुख्य इमारतीसमोर रिंगण सोहळाही रंगला. विद्यार्थी मराठी भाषेच्या प्रसार व संवर्धनाच्या अनुषंगाने तसेच विविध मराठी बोलींचे फलक घेऊन दिंडीत सहभागी झाले.

2 8 FEB 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना निवडणूक कामाचे प्रशिक्षण

## मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी सादर केलेल्या पथनाट्याचे कौतुक राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, संजय शिंदे, समाधान शेंडगे, तानाजी चौगुले, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २७ : 'राज्याच्या लोकसंख्येत युवा मतदार ३५ टक्के आहेत. निवडणूक आयोगातर्फे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निवडणूक कामकाजाच्या प्रशिक्षणाची (इंटर्नशिप) संधी दिली जाणार आहे. मतदार साक्षरता मोहिमेच्या कामाची दखल भारत निवडणूक आयोगाने घ्यावी, असे भरीव योगदान शिवाजी विद्यापीठाने द्यावे', असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात मुख्य निवडणूक अधिकारी देशपांडे यांनी विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी संवाद साधला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अप्पर जिल्हाधिकारी संजय शिंदे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी समाधान शेंडगे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते. मतदार नोंदणीत उत्कृष्ट काम करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला.

देशपांडे म्हणाले, 'विद्यार्थी मतदार जनजागृतीबरोबरच मतदान व मतमोजणी दिवशी स्वयंसेवक म्हणूनही काम करतील. यामुळे त्यांना निवडणूक प्रक्रियेचे काम जवळून पाहता येईल. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना निवडणूक आयोगाचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या संधीचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी निवडणूक प्रक्रियेत तरुणांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. येत्या लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढल्यास त्याचे श्रेय युवा मतदारांना द्यावे लागेल.'

डॉ. पाटील म्हणाले, 'निवडणूक आयोगाने मतदान व मतमोजणी प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्याचा सुरू केलेला उपक्रम महत्त्वपूर्ण आहे.

### महाविद्यालयांनी प्रोत्साहन द्यावे

'कोल्हापूर जिल्ह्यात महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थिनींची मतदार नोंदणी चांगली झाली असून, येत्या निवडणुकांमध्ये नवमतदारांनी मतदानाचा हक्क बजावून मतदानाचा टक्का वाढवावा. यासाठी मतदान करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सत्कारासारखे प्रोत्साहनपर कार्यक्रम महाविद्यालयांनी घ्यावेत. जनजागृतीसाठी विशेष प्रयत्न करावेत', असे आवाहन देशपांडे यांनी केले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 FEB 2024
लोकसत्ता

# ध्येयप्रती सजगता हवी -डॉ. दिगंबर शिर्के

**सांगली :** आजची तरुण पिढी ध्येयापासून बाजूला जात आहे. यामागे हातातील भ्रमणध्वनीवर सुरू असलेल्या ओटीटी चित्रफिती काही प्रमाणात कारणीभूत आहेत असे वाटते. आपल्याला काही तरी बनण्यासाठी ध्येयप्रती सजगता बाळगण्याची गरज आहे ही बाब गौतमीपुत्र कांबळे यांच्या पुस्तकातून शिकायला मिळते असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले.

मानवमुक्ती चळवळीतील कृतिशील विचारवंत तथा साहित्यिक गौतमीपुत्र कांबळे यांच्या पंचाहत्तरीनिमित्त सन्मान सोहळा रविवारी सांगलीत आयोजित करण्यात आला होता. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत संवाद मानवमुक्तीच्या प्रवाहाशी आणि मानवमुक्तीचा पथदर्शक या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

जनसंपर्क कक्ष
2 8 FEB 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित पन्हाळा–पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहिमेच्या उद्‌घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, यांच्यासह अधिकारी, शिक्षक, कर्मचारी, स्वयंसेवक.

# शिव पावन प्रेरणा मोहिमेत ३५० जणांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित पन्हाळा–पावनखिंड शिवपावन प्रेरणा मोहिमेस यंदाही मोठा प्रतिसाद लाभला. ३०० स्वयंसेवक, ५० प्रशासकीय सेवकही सहभागी झाले. विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि चिखली येथील देशभक्त आनंदराव नाईक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोहीम आयोजिली होती.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते २४ फेब्रुवारीला शिवपावन प्रेरणा मोहिमेचे उद्‌घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते बाजीप्रभू देशपांडे आणि शिवा काशीद यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी प्रास्ताविक केले. चिखली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी परीक्षा नियंत्रक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. पोपटराव माळी व कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील स्वयंसेवक उपस्थित होते. पहिल्या दिवशी पन्हाळा ते मसाई पठार करून करपेवाडी मुक्कामी स्वयंसेवक पोहोचले. विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. दुसऱ्या दिवशी पांढरेपाणी येथे मोहीम पोहोचली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीसह मिरवणूक काढली. यावेळी कुलगुरू प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते.



कोल्हापूर : सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालयातर्फे मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. नंदकुमार मोरे. शेजारी डावीकडून रूपेश पवार, शिवतेज देवणे, डॉ. शैलेंद्र कांबळे, आर्या पवार, डॉ. मोहन जाधव.

# मराठी भाषा साहित्य क्षेत्रात करते जगाशी स्पर्धा

## डॉ. नंदकुमार मोरे : 'यिन'तर्फे कृषी महाविद्यालयात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २७ : मराठी भाषेत सौंदर्यपूर्णता असून, ती साहित्य क्षेत्रात जगाशी स्पर्धा करत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आज येथे केले.

सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन) व राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृषी महाविद्यालयातर्फे मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. शैलेंद्र कांबळे अध्यक्षस्थानी होते. कृषी महाविद्यालयाच्या सभागृहात व्याख्यान झाले.

डॉ. मोरे म्हणाले, 'माणूस जन्मानंतर भाषेशी जोडला जातो. माणूस म्हणून सामाजिकीकरणाची जी प्रक्रिया असते, त्यात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असते. भाषेशिवाय माणूस विचार करू शकत नाही. क्षेत्र कोणतेही असो तेथे भाषेचा वाटा मोठा असतो. कारण ती ज्ञानाचे माध्यम असते. केवळ अनास्थेमुळे भाषेचे महत्त्व मागे पडत आहे. त्यासाठी मराठी साहित्याचे वाचन आवश्यक आहे. छत्रपती शिवरायांची ज्या भूभागावर सत्ता होती, तेथे मराठी भाषा बोलली गेली. पुढे महादजी शिंदे असोत किंवा अन्य राज्यकर्ते त्यांनी मराठी भाषेतून व्यवहार सुरू ठेवला.'

कांबळे यांनी भाषेतील काही शब्द लुप्त होत असून, मराठी शब्दकोशातून ते टिकविण्याचे काम सुरू असल्याचे स्पष्ट केले. यिनचे गृहमंत्री शिवतेज देवणे, यिन अध्यक्ष आर्या पवार, उपाध्यक्ष रूपेश पवार उपस्थित होते. डॉ. मोहन जाधव यांनी प्रास्ताविक केले. धनश्री माने, वैष्णवी लोकरे यांनी सूत्रसंचालन केले. यिन सहायक व्यवस्थापक अवधूत गायकवाड, यिन प्रतिनिधी राजलक्ष्मी कदम, वैष्णवी कौंदाडे यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
2 8 FEB 2024 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात टेस्ट ट्यूबमध्ये दुर्मीळ वनस्पतींचे संवर्धन

## वनस्पतीशास्त्र विभागाचा उपक्रम; १५ वर्षांत १०० वनस्पतींवर संशोधन


**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात पॉलीगाला, पिंडा कोकेनेन्सिसला यासह १०० उपयोगी दुर्मीळ वनस्पतींचे टेस्ट ट्यूबमध्ये ऊती संवर्धन केले जात आहे. विविध प्रकारच्या दुर्मीळ वनस्पतींची लागवड करता येईल, असे संशोधन प्रयोगशाळेत होत आहे. विविध आजारांवर उपायोगी अशी औषधी शोधण्याचे प्रयत्न सुरू आहे.

भारताला आयुर्वेदाची प्राचीन परंपरा आहे. देशभरात आयुर्वेदिक वनस्पतींचा खजिना आहे, परंतु त्यावर सखोल संशोधन न झाल्याने अनेक वनस्पती नामशेष होत असल्याचे चित्र आहे. बऱ्याचशा औषधी वनस्पती या दुर्मीळ आहेत व त्या वर्षभर उपलब्ध नसतात. तथापि, प्रयोगशाळेतील संशोधनातून या वनस्पतीतून वर्षभरात औषध निर्मिती शक्य होते. काही उपयोगी वनस्पतींचे पुनरुज्जीवन विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतील टेस्ट ट्यूबमध्ये केले जात आहे. मराठीत यास ऊती संवर्धन तर इंग्रजीत टिश्यू कल्चर असे म्हणतात. नामशेष झालेल्या झाडांचे बियाणेच सापडले पाहिजे असे नाही तर त्या झाडाचे खोड, पान, फांदी अथवा परागकण जरी सापडले तरी त्या दुर्मीळ झाडाचा पुनर्जन्म प्रयोगशाळेत केला जाऊ शकतो.



पॉलीगाला



पिंडा कोकेनेन्सिसला

> टिश्यू कल्चर अतिशय उपयुक्त तंत्रज्ञान आहे. या तंत्रज्ञानाने जैवविविधतेचे संगोपन करणे व याचा ऱ्हास ना होऊ देता वनस्पतीमधून घटक मिळवणे शक्य आहे. पश्चिम घाटातील जैवविविधता लक्षात या तंत्रज्ञाना अधिकाधिक वापर होणे गरजेचे आहे.
>
> **- प्रा. डॉ. मानसिंगराज निंबाळकर, वनस्पतीशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ**

**राष्ट्रीय विज्ञान दिन विशेष**

'पॉलीगाला' ही औषधीदृष्ट्या महत्त्वाची व पॉलीगॅलेसी कुटुंबातील एक प्रमुख वनस्पती आहे. 'पॉलीगाला'ला मराठीमध्ये गुलपंखी असे म्हणतात. पॉलीगाला प्रजातीचा उपयोग साप चावण्यावर उपचारासाठी व खोकला, ब्राँकायटिससाठी कफ पाडणारे औषध म्हणून करतात. याशिवाय पॉलीगाला प्रजातींचा वापर न्यूरोप्रोटेक्टिव्ह, अँटिडिप्रेसंट, वेदनशामक, अँटी-एथेरोस्क्लेरोसिस, सायटोटॉक्सिक, अँटिट्यूमर, झेंथिन-ऑक्सिडेस इनहिबिटरी इफेक्ट, अँटीओबेसिटी इफेक्ट, ऑस्टियोपोरोसिसचा पॉलीसेकेराइड प्रतिबंध करणारी आहे.

पिंडा कोकेनेन्सिसला मराठीत 'कोकण पंद' असे म्हणतात. पिंडा ही कंदयुक्त मुळे असलेली औषधी वनस्पती आहे. त्यात लहान फांद्या असलेल्या देठ व पिनेट पाने पांढरी असतात. फुले आकर्षक कंपाऊंड छत्रांमध्ये गुंफलेली, अधूनमधून पश्चिम घाटाच्या जंगलात उंच कडांवर दिसतात. लोक न शिजवतादेखील खातात. वनस्पतीचा दाहक-विरोधी, सौंदर्य प्रसाधने व कॅन्सरवरील उपचारासाठी उपयोग होतो.

जनसंपर्क कक्ष
2 8 FEB 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सार्वभौमत्व हे शिवस्वराज्याचे वैशिष्ट्य : डॉ. कुलकर्णी

**कोल्हापूर :** लोककल्याण आणि सहिष्णुता हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा पाया होता, तर सार्वभौमत्व हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५० व्या शिवस्वराज्य दिनाच्या निमित्ताने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेअंतर्गत सोमवारी 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाल्या,



छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे त्या काळच्या सामंतशाहीच्या विपरीत निर्माण झालेले होते. उत्तर प्रदेशापासून ते तामिळनाडू प्रांतापर्यंत संपूर्ण देशाला प्रेरणा देण्याचे कार्य या घटनेने केले. छत्रपतींच्या आज्ञापत्रांतून राज्य, स्वराज्य, महाराष्ट्रभूमी अशा शब्दांनी स्वराज्याचे वर्णन दिसून येते. राज्याच्या संकल्पनेमध्ये लोकसंख्या, विशिष्ट लोकसमूहांचा भूप्रदेश, शासन संस्थेचे लोकाभिमुख स्वरूप आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सार्वभौम हक्क यांचा समावेश होतो. ही सार्वभौमिकता हे छत्रपतींच्या स्वराज्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून सामोरे येते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, स्वराज्यनिर्मितीची प्रक्रिया ही महाराष्ट्राच्या इतिहासातील, लोकजीवनातील फार महत्त्वाची प्रक्रिया आहे. या भूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी घडविलेल्या राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक आणि मानसिक अभिसरणातून येथील लोकांचे जीवनमान, राहणीमान यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होऊ शकला. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. यावेळी डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अरुण भोसले, डॉ. एम. ए. लोहार, डॉ. कपिल राजहंस, डॉ. दत्तात्रय मचाले उपस्थित होते.


2 8 FEB 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठासमोर वाहतूक एकेरी

## भुयारी, सेवामार्ग काम सुरू : सुरक्षेसाठी ठरणार उपयुक्त

शाहू नाका, ता. २७ : शिवाजी विद्यापीठातील पूर्व बाजूकडून पश्चिम बाजूकडे ये-जा करण्यासाठी भुयारी मार्ग व सेवामार्गाच्या कामास प्रारंभ झाला. विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच अभ्यागतच्या वाहतुकीच्या सुरक्षेसाठी हा भुयारी मार्ग उपयुक्त ठरेल.

शिवाजी विद्यापीठाचा ८५३ एकरांचा विस्तीर्ण परिसर आहे. परिसर जुना पुणे-बंगळूर महामार्गामुळे पूर्व व पश्चिम बाजूस विभागला आहे. महामार्गाचे महापालिकेमार्फत चौपदरीकरण व मध्य विभाजक तसेच फूटपाथ रुंदीकरण केले आहे. विद्यापीठाच्या पश्चिम भागात मुख्य प्रशासकीय इमारतीसह विविध अधिविभागांच्या इमारतीसह क्रीडासंकुल आहे. पूर्व भागात तंत्रज्ञान अधिविभाग, जर्नालिझम व मास कम्युनिकेशन, सायबर सिक्युरिटी सेंटर, स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, शाहू रिसर्च सेंटर, शिक्षणशास्त्रसह अन्य विभागांचे काम सुरू आहे. पूर्व बाजूकडून पश्चिम बाजूकडे ये-जा करणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापक, प्राशसकीय कर्मचारी, नागरिक, पालक व अभ्यागत असे दोन हजार जण या मार्गांचा वापर करत होते; मात्र महामार्गावरील वाढती वाहतूक पाहता रस्ता असुरक्षित बनला होता. सकाळी दहा ते अकरा व सायंकाळी सहाला मार्गावर वाहतूक कोंडी होत होती. हे लक्षात घेऊन विद्यापीठाने भुयारी मार्ग व सेवा मार्ग बांधण्यासाठी शासनाकडे मागणी केली होती. त्याला उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता दिली. या कामास प्रारंभ झाल्याने विद्यापीठ प्रवेशद्वारासमोर महामार्गावरील वाहतूक एकेरी केली आहे.




शाहू नाका : शिवाजी विद्यापीठनजीक भुयारी व सेवामार्गाच्या कामाला सुरुवात झाल्याने वाहतूक एकेरी केली आहे.

> “ या भुयारी मार्गाचे संपूर्ण काम सहा महिन्यांत पूर्ण करण्यात येईल. सध्या सुरू असलेले रस्त्यावरील काम दोन महिन्यांमध्ये पूर्ण होईल.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे** कुलसचिव

### असे आहे काम....

विद्यापीठातील पश्चिम बाजूने ग्रंथालयापासून पुणे-बंगळूर रस्त्यापर्यंतचा एक भाग व रस्त्याच्या पूर्व बाजूपासून सर्व्हिस रस्त्यापर्यंत एक भाग असे दोन जोड रस्ते आहेत. पश्चिम बाजूकडील जोड रस्त्याची लांबी १६६.०० मीटर आहे. भुयारी मार्गापर्यंत रस्त्याचा उतार १:२० इतका आहे. पूर्व बाजूकडील जोड रस्त्याची लांबी २९.३२ मीटर इतकी आहे. भुयारी मार्गापासून सर्व्हिस रोडपर्यंतचा चढ १:३० इतका प्रस्तावित आहे.